प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

जानेवारी 31, 2019

**रिझर्व बँकेकडून डिजिटल व्यवहारांसाठीच्या लोकपाल योजनेची सुरुवात**

डिसेंबर 5, 2018 रोजीच्या नाणेविषयक धोरण निवेदनात घोषित केल्यानुसार, भारतीय रिझर्व बँकेने (आरबीआय), अधिसूचना दि. जानेवारी 31, 2019 अन्वये, वरील योजनेत व्याख्या केलेल्या प्रणाली सहभागींविरुध्दच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी, आज, **डिजिटल व्यवहारांसाठीच्या लोकपाल योजनेची (ओएसडीटी)** सुरुवात केली.

प्रदान व समायोजन अधिनियम 2007 च्या कलम 18 खाली सुरु केलेली ही योजना, आरबीआयने नियंत्रित केलेल्या बिगर बँकिंग संस्थांच्या मार्फत केल्या गेलेल्या डिजिटल व्यवहारातील ग्राहक सेवांच्या त्रुटी संबंधीच्या तक्रारींचे निःशुल्क व जलद निवारण उपलब्ध करुन देते. बँकांद्वारे केल्या गेलेल्या डिजिटल व्यवहारांबाबतच्या तक्रारींचे निराकरण बँकिंग लोकपाल योजनेखाली केले जाईल. डिजिटल व्यवहार लोकपालांची कार्यालये, बँकिंग लोकपालांच्या विद्यमान 21 कार्यालयांमध्येच असतील व त्यांच्या संबंधित प्रादेशिक अधिकार क्षेत्रातील ग्राहक तक्रारी ते हाताळतील.

ह्या योजनेसाठी अपीलीय यंत्रणा उपलब्ध आहे. त्याखाली तक्रारदार/प्रणाली सहभागी ह्यांना, लोकपालाने दिलेल्या निर्णयाविरुध्द अपीलीय प्राधिकरणाकडे अपील करण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

ही संपूर्ण योजना आरबीआयच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**जोस जे. कत्तूर**
मुख्य महाव्यवस्थापक

**वृत्तपत्र निवेदन : 2018-2019/1802**